महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ८ वे दिनांक : २७/१२/२०२५ वार : शनिवार

## हिंदूंचे कमीत कमी नुकसान करणाऱ्यांना मत द्या - शरद पोंक्षे



**कल्याण** : महा-नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या असून सर्व पक्षांनी जोरदार प्रचार करण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी महायुती एकत्र लढणार आहे, तर काही ठिकाणी स्वबळावर. महाविकास आघाडीतही जागावाटपावर चर्चा सुरू असून मुंबईत ठाकरे बंधूंनी युती केली आहे. या प्रचाराच्या रणधुमाळीत नेत्यांसह कलाकारही सहभागी होताना दिसत आहेत. मराठी अभिनेते शरद पोंक्षे यांनी देखील हिंदुत्वाच्या मुद्द्यावर भाष्य केले आहे.

हिंदूंचे कमीत कमी नुकसान करणाऱ्यांना मत द्या, असे आवाहन शरद पोंक्षे यांनी केले आहे. तसेच मत देताना सामाजिक हिताचा विचार करावा, असेही त्यांनी म्हटले आहे. यावेळी बोलताना त्यांनी गांधी परिवारावरही जोरदार निशाणा साधला आहे. कल्याण येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या कार्यक्रमात शरद पोंक्षे बोलत होते.

शरद पोंक्षे यांनी आपल्या भाषणात लोकशाहीतील निवडणुकांचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले की, लोकशाही राज्यामध्ये आपल्या हिंदूंना दोन प्रकारच्या लढाया लढायच्या आहेत. पहिली लढाई ही निवडणुकीच्या मैदानात बटन दाबून जिंकायची आहे. जो हिंदू हित की बात करेगा वही देश पे राज करेगा, हे वाक्य मनात कोरून ठेवायचे आहे. तसेच यावेळी बोलताना त्यांनी गांधी परिवारावर टीका केली. ते म्हणाले, तीन माणसांचे घर ज्याला चालवता येत नाही, त्यांनी 140 कोटींचा देश चालवणाऱ्याला शिकवू नये, असा घणाघात पोंक्षे यांनी केला.

पुढे बोलताना शरद पोंक्षे म्हणाले, हलालच्या वस्तू वापरू नका. जाळीच्या टोपीवाल्यांकडून काहीही खरेदी करू नका. दोन्ही लढाई आपल्याला गुप्तपणे लढायच्या आहेत. संविधानाने दिलेल्या अधिकारात आपल्याला गुप्तपणे लढाई लढायची आहे. हिंदू राष्ट्र तयार करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना नेमकी कुठली लढाई जिंकायची आहे, ते मी तुम्हाला सांगितले आहे. दरम्यान, त्यांनी केलेल्या या वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## शरद पवार एनडीएमध्ये येऊ शकतात : मंत्री संजय शिरसाटांचे मोठे विधान



**छत्रपती संभाजीनगर** : महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी करणार का? असा सवालही राजकीय वर्तुळात उपस्थित झाला आहे. यावर बोलताना शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले की, अजित पवार सत्तेत आहेत, ते कुठे जाणार नाहीत. परंतु, शरद पवार एनडीएमध्ये येऊ शकतात, असा दावा शिरसाट यांनी केला आहे.

संजय शिरसाट म्हणाले, अजित दादा सत्तेमध्ये आहेत. त्यांच्याकडे महत्त्वाचे पद आहे. त्यामुळे अजित दादा कोणीकडे जाणार नाहीत. परंतु, शरद पवार एनडीएमध्ये येऊ शकतात. शरद पवार यांना एनडीएमध्ये घ्यायचे की नाही, हा निर्णय भाजपचे वरिष्ठ ठरवतील. राष्ट्रवादीची भाजपसोबत आघाडी आहे आणि आमची युती भाजपसोबत आहे. म्हणून भाजपची शरद पवार यांच्याबद्दल काय भूमिका असेल ती भाजपने ठरवावी. शरद पवार हे जास्त काही विरोधी पक्षात राहू शकत नाहीत. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास बघितला तर त्यांनी अनेक वेळा असे उलट-सुलटे प्रयत्न केले आहेत, असे शिरसाट म्हणाले.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, शरद पवार यांना एनडीएमध्ये घ्यायचे की नाही हे एनडीएच्या नेत्यांनी ठरवायचे आहे. आम्ही पहिल्यापासून सांगत आलो आहोत, भाजपची आणि आमची नैसर्गिक युती आहे. इतर घटक पक्ष एनडीएमध्ये येत असतील तर त्याला भाजप जबाबदार राहील, आम्ही नाही, असेही शिरसाट यांनी स्पष्ट केले.

आगामी निवडणुकांच्या संदर्भात बोलताना सणजे शिरसाट म्हणाले, भाजप आणि शिवसेनेकडे इच्छुकांची गर्दी जास्त आहे. कोणता प्रभाग सोडायचा, तसेच कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ नये ही आमची भूमिका आहे. इच्छुक हस्त आहेत आणि जागा कमी आहेत, म्हणून कोणती जागा घ्यायची आणि लढवायची ही चर्चा होणे गरजेचे आहे. आज किंवा उद्या युतीची घोषणा होईल. भाजप-शिवसेनेने छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणूक युतीमध्ये लढवण्याचा निर्णय घेतला आहे. दोन-चार जागेवर जे आलेले आहे, त्यावर मंत्री अतुल सावे आणि मी चर्चा करणार आहोत आणि योग्य निर्णय घेणार आहोत.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, युतीबाबत चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. कोण कुठे लढणार याची यादी एक-दोन दिवसात फायनल होईल. अतुल सावे आणि मी फायनल चर्चा करून, ती यादी भाजपा आणि शिवसेनेच्या वरिष्ठांना पाठवू आणि नंतर जाहीर केली जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

## गणपती बाप्पांना सांताक्लॉजच्या रूपात दाखवल्याने वाद






**कोल्हापूर** : नाताळ सणानिमित्त भाजपने दिलेल्या एका जाहिरातीत महाराष्ट्राचे आराध्य दैवत गणपती बाप्पांना सांताक्लॉजच्या रूपात दाखवल्याने मोठा वाद निर्माण झाला असून, यावरून काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी भाजपवर बोचरी टीका केली आहे. निवडणुकांसाठी हिंदुत्वाचा अजेंडा राबवणाऱ्या भाजपने हिंदूंच्या धार्मिक भावनांशी केलेला हा खेळ अत्यंत निषेधार्ह असल्याचे सांगत, पाटील यांनी या कृतीचा तीव्र शब्दांत समाचार घेतला. स्वतःला हिंदू संस्कृतीचे रक्षक म्हणवून घेणाऱ्या भाजप सरकारचा खरा चेहरा या दुटप्पीपणातून समोर आला आहे, असा घणाघातही त्यांनी केला असून या जाहिरातीमुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे.

सतेज पाटील यांनी ट्विट करत म्हटले की, हिंदू संस्कृतीचे स्वयंघोषित रक्षक असल्याचा आव दाखवणाऱ्या भाजप सरकारचा दुटप्पीपणा पहा. सांस्कृतिक मंत्रालयाच्या जाहिरातीत महाराष्ट्राचं आराध्य दैवत गणपती बाप्पांना थेट सांताक्लॉजच्या रूपात दाखवले आहे. हा प्रकार हिंदू संस्कृतीचा आणि श्रद्धेचा अपमान नाही का? सरकारचा पीआर करण्यासाठी दैवतांचे रूप बदलणे, हेच का स्वयंघोषित संस्कृती रक्षकांचे कर्तव्य? श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक अस्मिता यांचा बाजार मांडून पीआर करण्याची ही वृत्ती आजची नाही. निवडणुकांसाठी "हिंदुत्व" जपणाऱ्या भाजप सरकारने हिंदू भावनांशी केलेला खेळ निषेधार्ह आहे.

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५


## "वीर बाल दिवस" निमित्त शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे व्याख्यान व निबंध स्पर्धा संपन्न




**कन्नड :** महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण मंत्रालय विभाग मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विद्यार्थ्यांमध्ये शौर्य, त्याग, राष्ट्रभक्ती व नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या वतीने 26 डिसेंबर हा "वीर बाल दिवस" म्हणून साजरा करण्यात आला या उपक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरुवातीस वीर बाल दिवस साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करण्यात येऊन गुरु गोविंद सिंह जी महाराजांचे पुत्र साहेब जादे अजित सिंह, झुंजारसिंह, जोरावर सिंह व फतेसिंह यांच्या अदितीय शौर्य, धर्मनिष्ठा व बलिदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली यानंतर मान्यवर वक्ते डॉ. उदय डोंगरे क्रीडा संचालक यांनी वीर बाल दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व, आजच्या तरुण पिढीने आत्मसात करावयाची मूल्य तसेच राष्ट्रासाठी समर्पणाची भावना यावर सखोल मार्गदर्शन केले तसेच "चार साहेबजादे "या विषयावर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण निबंध सादर केला परीक्षकांनी निबंधातील विषय मांडणी, आशयाची खोली व भाषिक शुद्धता या निकषावर मूल्यांकन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचे मार्गदर्शन लाभले त्यांनी निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक एनएसएस विभाग

कार्यक्रमाधिकारी डॉ प्रकाश महाजन यांनी केले तर आभार प्रदर्शन एनएसएस विभाग कार्यक्रमाधिकारी डॉ. आर व्ही अहिरराव यांनी केले यावेळी मोठ्या प्रमाणात महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक विद्यार्थी यांची उपस्थिती होती

## कवी संदीप वाकडे यांच्या काव्य-संग्रहाचे प्रकाशन स्नेहसंमेलनात








**चापानेर (ता. कन्नड) :** येथे श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूलचे उपप्राचार्य ,कवी संदीप वाकडे लिखित 'घामाने भिजलेली माती' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा स्नेहसंमेलनात आयोजित करण्यात येणार आहे. हा प्रकाशन कार्यक्रम शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे होणार आहे.या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सौ. संजनाताई जाधव, आमदार, कन्नड विधानसभा मतदारसंघ या उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री, उपविभागीय पोलिस आयुक्तालय, कन्नड यांच्या शुभहस्ते होणार आहे. तसेच सौ. सभाहत मोईनुद्दीन शेख, गटशिक्षणाधिकारी, कन्नड या प्रमुख उपस्थित राहणार आहेत.'घामाने भिजलेली माती' हा काव्यसंग्रह ग्रामीण जीवन, श्रमिकांचे कष्ट, शेतकरी वास्तव व मानवी संवेदनांचा सखोल वेध घेणारा आहे. मातीशी नाते जपणारी भाषा व सामाजिक आशय हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य मानले जाते.या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी, शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल व तिफन परिवार कन्नड यांच्या वतीने करण्यात आले आहे.






# सातबारा

आभाळाने दडी मारता, रडतोय सातबारा
ओल्या दुष्काळात, सडतोय सातबारा

काळजाच्या शिवारात, रुजतोय सातबारा
ओल्या चिंब पावसात,भिजतोय सातबारा

घरासाठी अहोरात्र, झिजतोय सातबारा
घामाच्या पावसात, खुलतोय सातबारा

दुष्काळी वनव्यात, होरपळतोय सातबारा
हमीभावाच्या आशेवर, जगतोय सातबारा

ऋण वाढता डोईवर, हरतोय सातबारा
वावरातल्या झाडावर, टांगतोय सातबारा

वारं भयान सुटता, थरथरतोय सातबारा
अस्मानी सुल्तानीशी, भांडतोय सातबारा

इतभर पोटासाठी, झुरतोय सातबारा
हिरव्या स्वप्नांसाठी, झटतोय सातबारा

जुन्या गोड आठवणीत, रमतोय सातबारा
मिरगाची सर येता, उगतोय सातबारा



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# तिफण कविता महोत्सवात कवितांचे चित्रप्रदर्शन




**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड तालुक्यातील अनेक कवी-लेखक सातत्याने लेखन करित असून त्यांची पुस्तके ही प्रसिद्ध होत आहे. कन्नड तालुक्यात साहित्यिक चळवळ चांगलीच बहरली असून अनेक नवोदित कवी पुढे येत आहेत. दरवर्षी तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड , त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने रविवार दि. ११ जानेवारी रोजी कन्नड येथे संपन्न होणाऱ्या आठव्या राज्यस्तरीय कविता महोत्सवात कन्नड तालुक्यातील कविंच्या कवितांचे चित्रकाव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. गिरीश सरनाईक, मनोज चौधरी, विजय बोर्से, बी.एस. सोननीस हे चित्रकार कवितांचे चित्रकाव्य प्रदर्शन भरवित आहेत, त्यांच्या कुंचल्यातून हे काव्यचित्र साकारले आहेत. कॅलियोग्राफी ही अनुभवावयास मिळणार आहेत. या काव्यचित्र प्रदर्शनाचे उदघाटन सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाचे अध्यक्ष ,उद्योजक मानसिंहजी पवार, कविता महोत्सवाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी नारायण सुमंत, उदघाटक कवी राजेंद्र दिघे, कविसंमेलानाचे अध्यक्ष प्रतिभा खैरनार, पंजाबराव मोरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) अश्विनी लाठकर, गट शिक्षणाधिकारी रमेश ठाकूर ,प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सर्जेराव जिगे, अँड कृष्णा जाधव , प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, रामकृष्ण पवार ,डॉ. रुपेश मोरे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात सहभागी व्हावे ,असे आवाहन कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे , संशोधन परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रविण दाभाडे , सचिव अरुण थोरात आणि संयोजन समितीने केले आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य

**भा**रतीय समाजजीवनाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे केवळ पदे, अधिकार किंवा यशस्वी कारकीर्द यापुरती मर्यादित राहत नाहीत, तर ती आपल्या विचारांनी, कार्याने आणि मूल्यांनी संपूर्ण समाजाला नवी दिशा देतात. अशीच एक तेजस्वी, दूरदर्शी आणि समाजाभिमुख व्यक्ती म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख होय. २७ डिसेंबर हा दिवस त्यांच्या जयंतीचा; केवळ एका राजकीय नेत्याची आठवण म्हणून नव्हे, तर भारतीय शेती, ग्रामीण समाज, शिक्षण व्यवस्था आणि शोषित घटकांच्या सशक्तीकरणासाठी आयुष्य वेचलेल्या एका महान समाजसुधारकाच्या कार्याचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य हे बहुआयामी, दीर्घकालीन परिणाम घडवणारे आणि आजही तितकेच सुसंगत असे आहे.डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म विदर्भातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी ग्रामीण जीवनातील कष्ट, दारिद्र्य, अज्ञान आणि सामाजिक विषमतेचा अनुभव घेतला. या अनुभवांनी त्यांच्या मनात केवळ व्यक्तिगत प्रगतीची महत्त्वाकांक्षा निर्माण केली नाही, तर समाजासाठी काहीतरी करावे, शेतकरी आणि ग्रामीण जनता शिक्षित, संघटित आणि सक्षम व्हावी, अशी तीव्र जाणीव रुजवली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवता येते, हा विश्वास त्यांच्या जीवनकार्याचा केंद्रबिंदू ठरला.शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत मूलभूत आणि दूरगामी होते. विदर्भातील शेतकरी, कामगार आणि गरीब वर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने त्यांनी शिक्षणसंस्थांची उभारणी केली. अमरावती येथे स्थापन झालेली श्री शिवाजी शिक्षण संस्था ही केवळ एक शैक्षणिक संस्था नव्हती, तर ती ग्रामीण समाजाच्या बौद्धिक आणि सामाजिक उन्नतीचे केंद्र बनली. त्या काळात उच्च शिक्षण हे शहरकेंद्रित आणि अभिजन वर्गापुरते मर्यादित होते; अशा परिस्थितीत ग्रामीण भागात शिक्षणाचे दालन खुले करणे हे मोठे धाडस होते. डॉ. देशमुख यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन मानले आणि ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य समजून घेताना त्यांच्या शेतकरी प्रश्नांवरील भूमिकेचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. स्वतः शेतकरी कुटुंबातून आलेल्या या नेत्याला शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आकडेवारीपुरत्या माहीत नव्हत्या, तर त्या त्यांच्या जीवनानुभवाचा भाग होत्या. जमीनधारणा, सिंचनाची कमतरता, सावकारशाहीचे जाचक बंधन, बाजारव्यवस्थेतील शोषण आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी कसा पिचत जातो, हे त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न हे केवळ आर्थिक नसून सामाजिक आणि मानसिकही आहेत, ही जाणीव त्यांच्या कार्यात सातत्याने दिसून येते.स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख भारताचे कृषिमंत्री झाले, तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड देताना शेतकऱ्यांचे पारंपरिक ज्ञान, अनुभव आणि स्वाभिमान अबाधित राहावा, याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. सिंचन प्रकल्प, कृषी संशोधन, सहकार चळवळ आणि कृषी शिक्षण यांना चालना देण्यामागे त्यांचा सामाजिक दृष्टिकोन स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्यासाठी शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नव्हती, तर ती ग्रामीण संस्कृतीचा आणि समाजजीवनाचा आधारस्तंभ होती.डॉ. देशमुख यांचे सामाजिक कार्य केवळ शिक्षण आणि शेतीपुरते मर्यादित नव्हते. समाजातील दुर्बल, मागास आणि वंचित घटकांचे जीवनमान उंचावणे, हा त्यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू होता. जातीभेद, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध त्यांनी आपल्या विचारांनी आणि कृतीने संघर्ष केला. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समता साध्य होऊ शकते, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या संस्थांमधून निर्माण झालेले विद्यार्थी केवळ नोकरी मिळवणारे कर्मचारी न बनता सामाजिक भान असलेले, जबाबदार नागरिक घडावेत, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.राजकीय जीवनात असूनही डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सत्तेचा उपयोग समाजसेवेसाठी कसा करता येतो, याचा आदर्श घालून दिला. राजकारण म्हणजे केवळ सत्तास्पर्धा नसून समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्याचे साधन आहे, हा विचार त्यांच्या कार्यातून सातत्याने प्रतिबिंबित होतो. त्यांनी संसदेत आणि मंत्रिमंडळात शेतकरी, ग्रामीण जनता आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित मुद्दे प्रभावीपणे मांडले. त्यांची भाषणे केवळ राजकीय घोषणांपुरती मर्यादित न राहता समाजशास्त्रीय जाणिवांनी परिपूर्ण असत.डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहकार चळवळीबद्दलची त्यांची भूमिका. सहकार ही ग्रामीण विकासाची प्रभावी साधनं ठरू शकतात, हा त्यांचा ठाम विश्वास होता. शेतकरी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवू शकतात, आर्थिक स्वावलंबन साधू शकतात आणि शोषणाविरुद्ध उभे राहू शकतात, यासाठी सहकार चळवळीला बळ देणे आवश्यक आहे, असे ते मानत. सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश मिळावा, त्यांना योग्य दर मिळावा आणि सावकारशाहीपासून मुक्ती मिळावी, हा त्यांच्या प्रयत्नांचा गाभा होता.सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने पाहता, डॉ. देशमुख यांची विचारधारा अत्यंत प्रगत आणि मानवतावादी होती. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि अन्यायकारक परंपरांविरुद्ध उघडपणे भूमिका घेतली. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकबुद्धी यांच्याशिवाय समाज प्रगती करू शकत नाही, हा विचार त्यांनी समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः ग्रामीण भागात महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक स्थान उंचावणे, यासाठी त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.आजच्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. शेतकरी आत्महत्या, ग्रामीण बेरोजगारी, शिक्षणातील असमानता आणि वाढती सामाजिक दरी या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा वेळी डॉ. देशमुख यांचा विचार आणि कार्य आपल्याला दिशा देऊ शकते. शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवून, शेतीला सन्मानाचे स्थान देऊन आणि सामाजिक न्यायाचा आग्रह धरूनच आपण समताधिष्ठित समाजाची निर्मिती करू शकतो, हे त्यांच्या जीवनकार्याचे सार आहे.डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करताना केवळ त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा अंगीकार करणे, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आजच्या समाजातील प्रश्नांवर उपाय शोधणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. शिक्षणाच्या माध्यमातून समाज सशक्त करणे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि राजकारणाला समाजसेवेचे साधन बनवणे, या त्रिसूत्रीवर आधारित त्यांचे सामाजिक कार्य आजही आपल्यासाठी दीपस्तंभासारखे आहे.अशा या महान समाजसुधारकाच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा स्मरणोत्सव साजरा करताना, आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. आपण त्यांच्या विचारांना कितपत पुढे नेत आहोत? आपल्या कृतीतून समाजातील दुर्बल घटकांसाठी काहीतरी करत आहोत का? डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन हे केवळ इतिहासातील एक सुवर्णपान नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्यासाठी प्रेरणा देणारे जिवंत मूल्य आहे. त्यांच्या सामाजिक कार्याला वंदन करून, त्यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्याची हीच खरी वेळ आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ डिसेंबर २०२५


## शनिवारी रंगणार कस्तुरबा इंग्लिश स्कूलचा स्नेहसंमेलनाचा नेत्रदीपक सोहळा



**चापानेर (ता. कन्नड) :** येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा दिनांक 27 डिसेंबर 2025 रोजी चापानेर येथे सायंकाळी 6 वाजता सुरू होणार आहे, आपल्या शैक्षणिक आणि सह शैक्षणिक उपक्रमांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चा यावर्षीचा स्नेहसंमेलन सोहळा कन्नडचे आमदार सौ संजना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून या कार्यक्रमासाठी कन्नडच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती सभाहत मोहिनुद्दीन शेख यांच्यासह सौ. मीनाक्षी किशोर पवार (जि. प.सदस्य) , डॉ. आदिती पाटील, डॉ. ऐश्वर्या किरण घुले, रत्नाकर फाळके, विकास जीव राग, विजयकुमार मांडे यासह मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती असणार आहे.या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात श्रीगणेश वंदनेने होणार असून त्यानंतर नृत्य, गीत, नाट्यछटा तसेच सामाजिक व देशभक्तीपर सादरीकरणांचा समावेश असणार आहे. “फिर भी दिल है”, “दरिया किनारे”, “मोबाईल थीम”, “वृद्धाश्रम”,यांसारख्या गीतांवर विद्यार्थ्यांचे आकर्षक नृत्य सादरीकरण होणार आहे.देशभक्तीपर “जीते हैं जंग” व आर्मी साँग याद्वारे राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त केली जाणार आहे. तसेच “सोशल मीडिया”, “स्कूल नहीं जाना है”, “कोई मिल गया” या गीतांच्या माध्यमातून आजच्या समाजातील विविध विषय प्रभावीपणे मांडले जाणार आहेत.लोककलेचा ठसा उमटवणारे आदिवासी गाणे, “रिमिक्स लावणी”, “अंबाबाई गोंधळाला”, “तुक-तुक चालू नको” यांसारखी सादरीकरणे विशेष आकर्षण ठरणार आहेत. याशिवाय “शिव तांडव”, “पालणा शिव प्रभूचा” व “आरती शिवाजी महाराज” या कार्यक्रमांतून शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा गौरव करण्यात येणार आहे.चापानेर व पंचक्रोशीतील रसीक श्रोत्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अशी आवाहन संस्थेचे अध्यक्ष दशरथ सोमासे, प्राचार्य कौशल्या सोमासे, संचालक केतन पवार, उपप्राचार्य संदीप वाकडे यांच्यासह वर्षा जाधव,भारती पवार, मनिषा पवार, आकांक्षा वैष्णव,दुर्गा वैष्णव, अभिलाषा वारखिंडे, दिव्या लोखंडे,पूजा लोखंडे , कविता हिरे, अंकुश राठोड,राजू राठोड आदींनी आदींनी केले आहे

## "मर्मगंध" चे तिफण कविता महोत्सवात प्रकाशन






**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव कार्यक्रमात ११ जानेवारी २०२६ रोजी रविवारी कन्नड येथे सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि त्रैमासिक तिफण भाषा साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित तिफण कविता महोत्सवात प्रसिध्द कवी अय्युब पठाण लोहगावकर लिखीत "मर्मगंध" या आशयघन व वास्तववादी दर्जेदार प्रौढ कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी नारायण सुमंत व उदघाटक राजेंद्र दिघे, आश्विनीताई लाटकर (माध्यमिक शिक्षणाधिकारी, छ. संभाजीनगर) आणि डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगरचे मराठी भाषा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे तसेच तिफण त्रैमासिक चळवळीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे. यावेळी होणाऱ्या कविसंमेलनाच्या अध्यक्षा प्रतिभा खैरनार, पंजाबराव मोरे, सिल्लोडचे गट शिक्षणाधिकारी रमेश ठाकुर, प्राचार्य विजय भोसले, अॅड कृष्णा जाधव, प्राचार्य राहूल क्षिरसागर, रामकृष्ण पवार आणि डॉ. रुपेश मोरे यांच्या विशेष उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा थाटात पार पडणार आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी /१२ वी पास
SANITARY HEALTH INSPECATOR — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी /१२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास

ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.